CMYK

# तारापूर येथे पत्नीला दगडाने मारहाण; पतीवर गुन्हा दाखल

**पंढरपूर** : न सांगता घरातून कुठे गेले होती? या कारणावरून पत्नीला लाथाबुक्क्या आणि दगडाने मारून गंभीर जखमी करण्यात आले. ही घटना तारापूर (ता.पंढरपूर) येथे रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. दिपाली दर्लींग पाटील (वय २० रा.तारापूर) असे जखमी विवाहितेचे नाव आहे. तिने त्या संदर्भात पंढरपूर तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी तिचा पती दर्लिंग परमेश्वर पाटील (रा. तारापूर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. ती रविवारी कपडे आणण्यासाठी सासरी केली होती. रात्री आल्यानंतर तिला तु सकाळपासून कुठे गेली होती. असे म्हणत पतीने तिला मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार शिंदे पुढील तपास करीत आहेत.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com । बुधवार, दि. ११ डिसेंबर २०२४ । वर्ष : २३ वे · अंक : ७२ वा · किंमत : ५ रुपये · पाने ८

# मारकडवाडी पुन्हा तापली

## खोत आणि पडळकरांनी आघाडीची 'धुंदी' उतरवली

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

**गेले दोन दिवस राजकीयदृष्ट्या शांत असलेली माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी मंगळवारी पुन्हा तापली.महाविकास आघाडीच्या नेत्यांनी ईव्हीएम यंत्रावर हरकती घेवून राजकीय वातावरण तापवले होते.ज्येष्ठ नेते शरद पवार हे येवून गेल्यानंतर दोन दिवस वातावरण शांत होते मात्र मंगळवारी भाजप नेते आ.गोपीचंद पडळकर आणि आ.सदाभाऊ खोत यांची गावात जाहीर सभा झाली. हे दोनही नेते तसे आक्रमक पण त्यांच्या भाषणात ग्रामीण बोलीभाषेचा बाज असतो.त्याच ढंगात दोघांनी आपल्या भाषणात जबरदस्त एकशीर एक महाविकास आघाडीच्या नेत्यांवर टोलेबाजी करून त्यांची धुंदी उतरवली. या दोघांनी आपल्या भाषणात विशेष करून शरद पवार यांच्यावर निशाणा साधला.**

ईव्हीएम समर्थनार्थ मारकडवाडीत भाजपने पडळकर आणि खोत यांच्या सभेचे आयोजन करून आज जाहीर सभा घेण्यात आली. शरद पवार यांच्या ईव्हीएमविरोधी सभेला त्यात प्रत्युत्तर दिले आहे.

याच पार्श्वभूमीवर खोत आणि पडळकर यांनी मारकडवाडीत जाहीर सभा घेत तुफान फटकेबाजी केली. पडळकर यांनी शरद पवारांवर घणाघाती टीका केली आहे. तसेच जयंत पाटील, आमदार रोहित पवारांसह सुप्रिया सुळेंवरही हल्लाबोल केला आहे.



आमदार गोपीचंद पडळकर



आमदार सदाभाऊ खोत

### ईव्हीएमच्या विरोधात थोबाड उचकटायचं नाही

ईव्हीएमला विरोधी करून बॅलेट पेपेरवर मतदान घेण्याची मागणी करणाऱ्या आणि त्यासाठी आंदोलन करणाऱ्या शरद पवारांना आमचे आव्हान आहे की. शरद पवारांनी सर्वप्रथम आपल्या लेकीचा, आपल्या नातवाचा तसेच जयंत पाटील यांचा राजीनामा घेतला पाहिजे. या तिघांचा पहिल्यांदा राजीनामा घेऊन त्यानंतर हे आंदोलन पुढे नेले पाहिजे. तसेच कॉंग्रेसच्या राहुल गांधी आणि त्यांच्या बहीण प्रियंका गांधी यांनीही राजीनामा देऊन या आंदोलनात सहभागी झालं पाहिजे. अन्यथा ईव्हीएम च्या विरोधात थोबाड उचकटायचं नाही, असे म्हणत पडळकरांनी शरद पवार, सुप्रिया सुळेंवर हल्लाबोल केला आहे. तुम्ही केवळ बळीचे बकरे आम्हालाच करत आहात. म्हणून राज्यातील प्रस्थापितांना आपल्याला उधळून लावावे लागेल असेही ते म्हणाले. बारामतीत माझे डिपॉझिट जप्त झाले होते. त्याच ईव्हीएममध्ये हे झाले होते. अमेरिकेतील अनेक राज्यात आणि अनेक देशात देखील ईव्हीएम वर मतदान होते. हवे तर राहुल गांधी यांनी मामाच्या इटलीत जावून चौकशी करावी, असा टोलाही पडळकरांनी लागवला.

### काय म्हणाले राम सातपुते?



मारकडवाडीत काय झालं हे इथल्या जनतेला माहिती आहे. मोहिते पाटलांची गुलामी हे गाव कधीही सहन करणार नाही. जानकरचे चार लोक म्हणजे गाव होत नाही. यांनी कितीही खोटे नॅरिटीव करू द्या. मी शंभर टक्के सांगतो. मला माझ्या कर्तृत्वावर विश्वास आहे की गोपी शेठ २०२९ ला शंभर टक्के गुलाल आपला असेल. जिथे कमी पडलो तिथे काम करेल. मारकडवाडीच्या इव्हेंटचा मास्टरमाइंड रणजितसिंह मोहिते पाटील आहे. मी फडणवीस साहेबांना सांगितलंय गद्दारांना माफी करायची नाही. रणजितसिंह मोहिते पाटील यांची हकालपट्टी झाली नाही तर पक्षातील कार्यकर्ते रक्ताने पत्र लिहून गद्दाराची हकलपट्टी करा,अशी मागणी करतील. आपल्या कार्यकर्त्यांनी रक्त सांडलंय. अकलूज मधील आपल्या मनोज साळुंखेंना मोहित्यांच्या गुंडाने बुधवर उभा राहिला म्हणून मारलंय.

### पाटलांना लायकी नुसार १०१ रुपयाचे बक्षीस

शरद पवार यांचे सर्व राजकारण विश्वासघातावर अवलंबून होते. त्यांची अक्कल देखील या आंदोलनात संपल्याचे दिसते. २०१७ ते २०२४ पर्यंत एकानेही मशीनमध्ये कसा घोटाळा होतो ते दाखवू शकले नाहीत. जयंत पाटील यांनी हे सिद्ध केले तर लायकी नुसार १०१ रुपयाचे बक्षीस आणि दुसऱ्या कोणीही हॅक करून दाखवल्यास ११ लाखाचे बक्षीस देऊ,अशा शब्दात पडळकर यांनी पाटलांना आडवे तिडवे घेतले.

### पहिल्यांदा यांचा बाप देवाभाऊ आलाय

ग्रामीण ढंगात खोत यांनीही तुफान टोलेबाजी केली. शरद पवारसाहेब लई हुशार...साहेबांना आता झोप लागेना...६० ते ७० वर्षे सत्ता भोगली...आता पहिल्यांदा यांचा बाप देवाभाऊ आला. देवाभाऊचा नावाचा वस्ताद या मातीत आला.लोकशाही वाचवण्याचे काम या गावाने केले. शरद पवार यांचा पक्ष नसून गुंड आणि लुटारुंची टोळी आहे आणि ते गाढायचे काम देवाभाऊने केले. २००४ कॉंग्रेसने मशीन आणली , १० वर्ष सत्ता भोगली...त्यावेळी मशीन चांगली.आता कशी वाईट.मारकडवाडी गाव भाग्यवान आहे. खळं लुटणारा या गावात आला आहे. दिवसाढवळ्या आमचं खळं कोण लुटतंय असा प्रश्न गावकऱ्यांना पडलेला. पण मारकडवाडीचे ग्रामस्थ लय बहाद्दर आहेत. त्यांनी भुलवत भुलवत खळं लुटणाऱ्याला गावात आणलंय,अशा शब्दात खोत यांनी पवारांच्या राजकीय भूमिकेची चिरफाड केली.

### मारकडवाडीतच लग्न लावू

''राहुल गांधींना मतपत्रिकेवर मतदान घ्यायचं आहे. बिचाऱ्याचं लग्न झालं पाहिजे बाबा. पोलिसांना मी विनंती करतो की, त्यांना दोन डबे मांडून द्या. तिथे मतपत्रिकेवर मतदान होऊ द्या. तो निवडून आला की त्याचा इथेच पंतप्रधानपदाचा शपथविधी घेऊ. त्याची इच्छा पूर्ण होऊ दे आणि इथेच त्याच्या डोक्यावर अक्षता पडू देत,अशा शब्दात खोत यांनी राहुल गांधी यांचा समाचार घेतला.

## कामती जवळ अपघात; चौघे जखमी

**सोलापूर** : वेगाने जाणाऱ्या मोटार चालकाचा स्टेअरिंग वरील ताबा सुटून मोटर झाडाला धडकल्याने दोन महिलासह चौघेजण जखमी झाले. हा अपघात कामती (ता.मोहोळ) येथे मंगळवारी सकाळच्या सुमारास घडला. युसूफ रसूलसाब सय्यद (वय ५९), नाझिया युसूफ सय्यद (वय ४८ दोघे रा.डीमार्ट समोर,जुळे सोलापूर), शरफोद्दीन हुसेनसाब नदाफ (वय ५२) आणि इशरत शरफोद्दीन नदाफ (वय २७ दोघे रा. विजापूर रोड नूर आपार्टमेंट) अशी जखमींची नावे आहेत. ते सर्वजण मंगळवारी सकाळी सोलापूर ते मंगळवेढा असा चारचाकी वाहनातून प्रवास करीत होते. कामती पासून ३ कि.मी. अंतरावर चालकाचा स्टेअरिंग वरील ताबा सुटल्याने मोटर रोडच्या खाली उतरून झाडाला धडकली.

## बांगलादेशातील हिंदूंना न्याय द्या, अन्यथा जशास तसे उत्तर देऊ: सकल हिंदू समाजाचा इशारा

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापुरात सकल हिंदू समाजाच्या वतीने न्याय यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. बांगलादेशातील हिंदूंना न्याय द्या अन्यथा जशास तसे उत्तर देऊ असा इशारा सकल हिंदू समाजाने दिला.

प्रारंभी सात रस्ता चौक येथील वीर शिरोमणी महाराणा प्रतापांच्या पुतळ्यास आणि छत्रपती शिवरायांचे पूजन करून तेथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत ही न्याय यात्रा काढण्यात आली. यानंतर बांगलादेश झेंडा आणि तेथील राष्ट्राध्यक्षांच्या फोटोला जोडेमार करत त्याचे दहन करण्यात आले. येणाऱ्या काळामध्ये बांगलादेशमध्ये होणारे हिंदू वरती अन्याय अत्याचार हे थांबले गेले पाहिजे अन्यथा याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा देखील यावेळी दिला आहे.



**सोलापूर : सकल हिंदू समाजाच्या वतीने न्याय यात्रा काढण्यात आली.**

यावेळी विश्व हिंदू परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांत मार्गदर्शक मंडळाचे सदस्य ह.भ.प. लक्ष्मण महाराज चव्हाण म्हणाले, बांगलादेशातील हिंदू बांधवांवर होणाऱ्या अत्याचारांचा निषेध करावा तितका कमी आहे. ज्या हिंदूंनी तेथील मुस्लिम समाजाला नैसर्गिक आणि इतर संकटांच्या वेळी मोठी मदत केली त्या ठिकाणी आज हिंदू समाजावर प्रचंड अत्याचार होत आहेत. त्यामुळे भारत सरकारने या विषयात त्वरित लक्ष घालून तेथील हिंदूंना सन्मानपूर्वक संरक्षण द्यावे. यावेळी सकल हिंदू समाज न्याय यात्रेस ह.भ.प लक्ष्मण महाराज चव्हाण यांच्यासह आ. देवेंद्र कोठे यांच्यासह हजारो हिंदू बांधव युवक महिला वकील, इंजिनिअर, आर्किटेक्चर, डॉक्टर, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### न्याय यात्रेत सहभागी झाले देवेंद्र कोठे यांच्यासह हिंदू बांधव

## वेळापूर येथे सराफाला ५५ हजारास गंडविले

**फसवणुकीचा गुन्हा**

**वेळापूर** : मोबाईलच्या स्कॅनरवरून पैसे जात नाही. तुम्हाला दुचाकीच्या डिकीतील पैसे आणून देतो. अशी थाप मारी एका भामट्याने ५५ हजाराचे दागिने घेऊन पसार झाला. ही फसवणूकीची घटना वेळापूर (ता. माळशिरस) येथील सोहम ज्वेलर्स या दुकानात ३ डिसेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास घडली.

यासंदर्भात ज्वेलर्सचे चालक प्रदीप प्रकाश वाडकर (रा. वेळापूर) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. ३ डिसेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास एक अनोळखी इसम दुकानात येऊन ५५ हजाराचे दागिने घेतले. मोबाईलच्या ऑनलाईन मधून पैसे जात नाही. दुकानासमोर लावलेल्या दुचाकीच्या डीकीतून पैसे आणून देतो, असे मालकास खोटे सांगून तो बाहेर गेला. त्यानंतर तो दागिने घेऊन दुचाकीवरून पसार झाला.अशी नोंद वेळापूर पोलिसात झाली. हवालदार पाटील पुढील तपास करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




त्यांचे सरकार येऊन सुरु पण झाले,आता आपले बघा!!

| कल्याण |
| --- |
| 224-84-347 |

| मुंबई |
| --- |
| 279-85-230 |

### डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांनी वेळ साधली

# पटोले सोलापुरात असताना दिला जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा

## खा. प्रणिती शिंदेंची मनमानी होत असल्याचा केला आरोप

**सोलापूर/प्रतिनिधी**

**कॉंग्रेस पक्ष मोठा की सुशीलकुमार शिंदे आणि प्रणिती शिंदे मोठ्या? हा प्रश्न रक्ताचे पाणी करून पळणाऱ्या कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांना पडला आहे, असे सांगत शिंदे कुटुंबाच्या मनमानीला कंटाळून सोलापूरचे कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील यांनी राजीनामा दिलेला आहे. धवलसिंह मोहिते -पाटील यांनी ६ पानी पत्र लिहून केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडत जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. विशेष म्हणजे कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले मंगळवारी सोलापुरात असताना डॉ. धवलसिंहांनी राजीनामा दिला आहे.**

ईव्हीएमवर शंका उपस्थित करून मतपत्रिकेचा आग्रह धरल्याने संपूर्ण राज्यात मारकडवाडी गाव चर्चेत आले आहे. याच गावाला कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भेट दिली. नेमकी हीच वेळ साधून धवलसिंह मोहिते पाटील यांनी राजीनामा दिला. विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसचा सोलापूर जिल्ह्यात दारूण पराभव झाला. अगदी प्रणिती शिंदे ज्या मतदारसंघातून तीन वेळा विजयी झाल्या, त्या मतदारसंघात कॉंग्रेसचा उमेदवार पराभूत झाला. पक्षापेक्षा सुशीलकुमार शिंदे आणि प्रणिती शिंदे वरचढ ठरत असल्याचे सांगून धवलसिंह मोहिते -पाटील यांनी राजीनामा दिला.

प्रणिती शिंदे आणि सुशीलकुमार शिंदे यांनी जाहीरपणे अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा दिला, त्या उमेदवाराची अनामत रक्कम जप्त झाली. या पाठिंब्यामुळे आघाडीतील मित्रपक्ष ठाकरे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नाराजी झाली. तसेच कॉंग्रेस पक्षाने आमच्याशी धोका केला, अशी बदनामी देखील झाली. यामुळे मतदारांमध्ये आक्रोश निर्माण झाला, असा प्रसंग धवलसिंह मोहिते पाटील यांनी आवर्जून पत्रात लिहिला आहे.




### सोलापूर जिल्ह्यात शिंदे कॉंग्रेस

सोलापूर जिल्ह्यात कॉंग्रेस नसून शिंदे कॉंग्रेस झाली आहे. अशी भावना कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण झाली आहे. त्यामुळे पक्षाचे काम करण्यात कार्यकर्त्यांना अडथळे येत आहेत. भविष्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिंदे गट प्रामाणिक कार्यकर्त्यांवर अन्याय करणार हे चित्र समोर दिसत असल्यामुळे कार्यकर्त्यांवरील अन्याय मी पाहू शकत नाही. म्हणून मी कॉंग्रेस जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे, असे पत्रात मोहिते यांनी नमूद केले आहे.

### भाजप प्रवेशाच्या चर्चा

लोकसभा निवडणुकीदरम्यान डॉ. धवलसिंह यांनी भाजपचे उमेदवार रणजितसिंह निंबाळकर यांचा प्रचार केल्याचे पाहायला मिळाले होते. त्यामुळे आता धवलसिंह मोहिते पाटील हे भारतीय जनता पार्टीमध्ये जाणार का? अशी चर्चा सुरू आहे. अकलूजमध्ये खा. धैर्यशिल मोहिते पाटील आणि आ.रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या विरोधात माजी आ. राम सातपुते एकटे लढत आहेत. आता त्यांना डॉ. धवलसिंहांची साथ मिळणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



CMYK